**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ,वाशी, नवी मुंबई–४००७०३.** /L20

परिपत्रक क्रमांक मुंविमं/शाखा लेखा–१ व २/नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण अंकाचे शुल्क
२०२२–२०२३/L20 दिनांक– 23/०६/२०२२.

संदर्भ :– राज्य मंडळाचे पत्र क्र रा.मं./प्रकाशन/शिक्षण संक्रमण/३२२२ दि.१५/०७/२०२०.

मुंबई विभागीय मंडळातील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना या परिपत्रकाद्वारे कळविणेत येते की, सन २०२२–२०२३ या शैक्षणिक वर्षाचे नोंदणी शुल्क मंडळ नियमावलीतील नियम क्रमांक ४७(१२) व ९४(१२) अन्वये व फेब्रुवारी–मार्च २०२२ मधील माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ १० वी ) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ १२ वी ) परीक्षेकरीता नोंदणी केलेल्या नियमित विद्यार्थी संख्येनुसार नोंदणी शुल्क तसेच शिक्षण संक्रमण अंकाचे शुल्क संदर्भिय पत्रानुसार मंडळाकडे **दि. १०/०८/२०२२ पर्यंत जमा करणे अनिवार्य आहे.**

तरी सर्व मान्यताप्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालय प्रमुख यांनी शुल्काची रक्कम रोखीने अथवा चलनाद्वारे (**बँक ऑफ इंडिया चे चलन इ १० खाते क्र ००८९१०२१००००२८ व इ १२ वी खाते क्र ००८९१०२१००००२९** )विहीत केलेल्या मुदतीमध्ये जमा करुन त्याबाबतची पावती/चलनाची प्रत पत्रासह मंडळ कार्यालयात विहीत दिनांकास जमा करावी.

| | शिक्षण संक्रमण व नोंदणी शुल्काचा तक्ता खालीलप्रमाणे | इ १०वी करीता | इ १२वी करीता |
|---|---|---|---|
| अ) | विद्यार्थी संख्या (इ १२ वी )/(इ १० वी ) फेब्रवारी–मार्च २०२२ | | |
| | १. १ ते १०० विद्यार्थी | रु.१०००/– | रु.१०००/– |
| | २. १०१ ते पुढील प्रत्येक १०० विद्यार्थ्यामागे | रु.२००/– | रु.४००/– |
| | ३. शिक्षण संक्रमण अंकाचे शुल्क | रु.५००/– | रु.५००/– |
| ब) | ११ऑगस्ट पासून भरावयाची दंडाची रक्कम खालील प्रमाणे | | |
| | १. ११ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०२२ पर्यंत | रु.२००/– प्रमाणे दंड | |
| | २. १ सप्टेबर ते ३० सप्टेंबर २०२२ पर्यंत | रु.३००/– प्रमाणे दंड | |
| | ३. १ ऑक्टोबर नंतर नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्र सादर करण्याच्या तारखेपर्यंत | रु ५००/– प्रमाणे दंड | |
| क) | मंडळाकडे शुल्क/चलनाची प्रत पत्रासह जमा करण्याच्या तारखा खालील प्रमाणे | | |
| | १. ०१.०८.२०२२ जिल्हा ३२ उत्तर मुंबई | | |
| | २. ०२.०८.२०२२ जिल्हा ३१ बुहन्मुंबई | | |
| | ३. ०३.०८.२०२२ जिल्हा ३३ दक्षिण मुंबई | | |
| | ४. ०४.०८.२०२२ जिल्हा ठाणे १६.०१ ते १६.०५ व १६.१६ ते १६.१९ | | |
| | ५. ०५.०८.२०२२ जिल्हा १६.१४ ते १६.१५ | | |
| | ६. ०६.०८.२०२२ जिल्हा रायगड १७ | | |
| | ७. ०८.०८.२०२२ जिल्हा पालघर १८ | | |

तसेच २०२१–२०२२ या वर्षाचे नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण अंकाचे शुल्काची रक्कम भरणा केली नसल्यास तात्काळ दंडासह उपरोक्त कार्यपध्दतीनुसार भरणा करण्यात यावी. अन्यथा मंडळ नियमावली नुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल,याची नोंद घ्यावी.

( डॉ सुभाष बोरसे )
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई –४०० ७०३

प्रति,

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
मुंबई विभागीय मंडळ कार्यालयाचे कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय.